# "शोध नृत्यकुंडक बीजाचा .......!"

वैद्य मदन टोंगे

सर्व संदर्भाचा विचार केल्यास 'नृत्यकुंडकबीज' म्हणून वर्णित केलेल्या तुम्बरूबीज, रागी (नाचणी / नागली), लघुकदंबफल, गोक्षुर (त्रिकण्टक), कतकबीज (निर्मली), धान्यक, कटुतुम्बीबीज, वींछुडा आदी द्रव्यांचा संदर्भासहित विचार केल्यास असे आढळते की या सर्व द्रव्यांचे मूत्रवह संस्थानावर कार्य असून, मूत्रल म्हणून कार्य करताना काहींचे अश्मरीभेदन हे कार्य ही आढळते. त्यामुळेच अनेक ग्रंथकारांनी 'नृत्यकुंडकबीज' हे नाव वापरत त्या त्या प्रदेश व काळात वर उल्लेख केलेल्या या विविध द्रव्यांचा वापर केला असावा.

**"नृत्यकुंडकबीजानां चूर्णं माक्षिकसंयुतम् । अविक्षीरेण सप्ताहं पीतमश्मपातनम् ।।" अ.हृ.चि.**

अष्टांग हृदय मूत्राघात चिकित्सा अध्यायात वरील संदर्भ आला आहे. तेथे नृत्यकुंडकबीज चूर्ण हे माक्षिक व अविक्षीरासह (मेंढीच्या दूधासोबत) घेतले असता, सप्ताहात अश्मरीपतन होते असे म्हटले आहे. या ठिकाणी सर्वांगसुंदर टिकाकाराने, **"तुम्बरीबिजानां चूर्णं माक्षिकान्वितम्ऽविक्षीरेण सप्ताहं पीतमश्मरिपातनम् ।"** असे म्हटले आहे. येथे नृत्यकुंडकबीजासाठी 'तुम्बरीबीज' असा संदर्भ घेण्यास सांगितला. इन्दुटिकेत **'नृत्यकुंडो मलिम्चकः ।'** असा संदर्भ आहे. कैयदेव निघंटुने रागी (नाचणी) यासाठी खालील पर्याय सांगितले आहेत.

**"मलिम्चको नृत्यकुंडो नर्तको नर्तकुण्टकः ।" कै.नि.** शालिग्राम निघंटुत रागीसाठी खालील पर्याय आहेत.

**'नर्तको नृत्यकुण्डश्च भुचरा च् मलीयसः । कठिनो गुच्छकणिशो लाच्छनो बहुपत्रकः ।।' शा.नि.** राज निघंटुने रागी विषयी म्हटले आहे, **"रागी तु लांच्छनः स्याद्बहुदलकणिशश्च गुच्छकणिशश्च ।" रा.नि.** अशा रितीने नृत्यकुंडकबीज हा शब्द रागी (नाचणी) Eleusine coracana, Cynosurus coracanus, Poaceae यव कुल यासाठी निघंटुत आला आहे.

**"नर्तकः पित्तहा शीतः ।" कै.नि.**

भावप्रकाशाने 'तुम्बरू' हे द्रव्य हरितक्यादी वर्गात वर्णन के आहे, ते Xanthoxylum alatum तेजोह्वा / तेजबल हे होय. याच्या फळांना तुम्बरू म्हटले आहे. याचे फळ व साल ही औषधात वापरली जाते. हे उष्णवीर्य व मूत्रल सांगितले आहे. भावप्रकाशाने मुत्रकृच्छ्रात याला वापरण्यास सांगितले आहे.

**"कुष्ठशुलारूचिश्वासप्लिहकृच्छ्राणी नाशयेत् ।" भा.प्र.**

सुश्रुताने उत्तरतंत्रात श्वासरोगचिकित्सेत नृत्यकुंडकबीजाचा उल्लेख केला आहे.

**"तिमिरस्य च बीजानि कर्कराख्या सुवर्चिका । दुरालभाऽथ पिप्पल्यः कतुकाख्या हरीतकी। श्वविन्मयूररोमाणि कोल मागधिककिणाः । भार्गीत्वक् शृंगबेर च शर्करा शल्लकाड्.जम् । नृत्यकौण्डबीजानि चूर्णितानि तु केवलम् ।"**

यावर डल्हण टिका,

**"नृत्यकौण्डको मर्कटकः, केचिनृत्तकौण्डक बीजानीत्यत्र नीचैः कदम्बबीजानि लघु कदम्बबीजानि । केचित् नीपं कदम्बं रक्तंच तत्पीतं तण्डुलाम्बुना इति पठन्ति, व्यारव्यानयन्तिच नीपं बृहत्कदम्बफलं, कदंबं लघुकदंबवृक्षफलं रक्तमिति विशेषणादनयोः पक्वयोर्ग्रहणं यतः परिपक्वं रक्तं भवति ।"**

या ठिकाणी नृत्यकुंडक बीज म्हणून 'मर्कटक' घ्यावयास सांगितले. पण डल्हणाने काही पाठात लघुकदम्ब वृक्षाचे पक्व रक्तवर्णी फळ घ्यावयास सांगितले आहेत. मर्कटस्ततृण हा पर्याय रागी (नागली) नाचणीसाठी आला आहे. मर्कटतृणम् असा शब्द वाग्भटकोष P.44 published by Indian Drug Research Association of Poona यात आला आहे. मर्कटकाला डल्हणाने 'मकरा इति लोके' असे म्हटले आहे. चक्रपाणीने नृत्यकुंडकबीजासाठी 'त्रिकंटकस्य बीजाना' असे म्हटले आहे. संग्रहमूलात भृंगकंटकबीजम् कतकबीज असा उल्लेख आहे. अशा प्रकारे नृत्यकुंडकबीजासाठी खालील संदर्भ आले आहेत.